वाचा: १) संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र. १५, दि.२२/१२/२०१५.
२) संचालनालयाचे स्थायी आदेश क्र. ७/२०१७, दि.१८/०४/२०१७.
३) संचालनालयाचे स्थायी आदेश क्र. १४/२०१७, दि.१२/०९/२०१७.

---

**संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा,**
**महाराष्ट्र राज्य, कोंकण भवन, ६ वा मजला,**
**नवी मुंबई -४०० ६१४.**

**स्थायी आदेश क्र. ०७ /२०१९, दिनांक:** 14 OCT 2019

विषय:- नगरपालिका लेखापरीक्षणाबाबत करावयाच्या कामकाजाबाबत.

**प्रस्तावना:**

उपरोक्त वाचा मधील क्रमांक २ अन्वये अ वर्ग नगरपालिकेबाबत जिल्हा सहाय्यक संचालक यांनी लेखापरीक्षण / तपासणी करावयाच्या बाबी विहीत करण्यात आल्या आहेत. तसेच वाचा मधील क्रमांक ३ चे आदेशान्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेखापरीक्षणाचे अनुषंगाने लेखापरीक्षण कार्यपध्दती व कार्यकक्षा निर्धारीत करताना अ वर्ग नगरपालिकेच्या लेखापरीक्षणाबाबत लेखापरीक्षा अधिकारी हे पथक प्रमुख म्हणून कार्यरत राहतील, असे निर्देश देण्यात आले आहेत. वाचा मधील क्रमांक १ च्या आदेशान्वये अ वर्ग नगरपालिकेच्या विशेष लेखापरीक्षणाबाबत लेखापरीक्षा अधिकारी / सहाय्यक लेखा परीक्षा अधिकारी हे पथक प्रमुख म्हणून कार्यरत राहतील असे निर्देश देण्यात आले आहेत. जिल्हा सहाय्यक संचालक यांनी अ वर्ग नगरपालिकेबाबत तपासणी करावयाच्या बाबींचे अनुषंगाने अ वर्ग नगरपालिकांच्या लेखापरीक्षणाबाबत वाचा मधील क्रमांक १ व ३ अन्वये विहीत निर्देशांबाबत सुधारणा करणे प्रस्तावित आहे, या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश:**

अ वर्ग नगरपालिकेच्या लेखापरीक्षणाबाबत पथक प्रमुख म्हणून जिल्हा सहाय्यक संचालक कार्यरत राहतील. अ वर्ग नगरपालिकांचे लेखापरीक्षणाबाबत वाचा मधील क्रमांक ३ अन्वये पुर्नविलोकन, अहवाल वाचन, अंतिमीकरण व अहवाल निर्गमन याबाबत देण्यात आलेले निर्देश व वाचा मधील क्रमांक २ अन्वये जिल्हा सहाय्यक संचालक यांनी अ वर्ग नगरपालिकाबाबत लेखापरीक्षणाबाबत तपासणी / लेखापरीक्षण करण्यात देण्यात आलेले निर्देश कायम ठेवण्यात येत आहेत.

अ वर्ग नगरपालिकेच्या लेखापरीक्षणाबाबत वाचा क्रमांक ३ चे आदेशात नमूद मात्र "अ वर्ग नगरपालिका व नगरपालिका शिक्षण मंडळाचे प्रमुख म्हणून लेखापरीक्षा अधिकारी कामकाज पाहतील" ही तरतूद अधिक्रमित करण्यात येत आहे.

तसेच वाचा मधील क्रमांक १ अन्वये अ वर्ग नगरपालिकेच्या विशेष लेखापरीक्षणाच्या कार्यपध्दती व कार्यकक्षेबाबत देण्यात आलेल्या निर्देशांत अंशत: बदल करण्यात येत असुन अ वर्ग नगरपालिकेच्या विशेष लेखापरीक्षणाबाबत पथक प्रमुख म्हणून सहाय्यक संचालक / लेखापरीक्षा अधिकारी कार्यरत राहतील.

सन २०१८-१९ चे नगरपालिका लेखापरीक्षणापासून वरीलप्रमाणे लेखापरीक्षण कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

(सु.रा.भोसले)
संचालक
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य.

प्रत माहितीस्तव तथा उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित :-

१. विभागीय सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा (सर्व)
२. जिल्हा सहाय्यक सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा (सर्व)